C-81- (574)

राज्यस्तरीय कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत कुशल मनुष्यबळ निर्मितीचे प्रशासकीय विभागनिहाय उद्दिष्ट निश्चित करणेबाबत..

**महाराष्ट्र शासन**

उच्च व तंत्र शिक्षण विभाग

शासन निर्णय क्र.कौविका-२०१२/(३८/२०१२)/व्यशि-५

मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.

दिनांक:- २२ मे, २०१२.

पहा:- १. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक कौविका-२०१०/(३/१०)/व्यशि-५, दिनांक १९/०५/२०१०.

२. मा.मुख्य सचिव महोदय यांच्या अध्यक्षतेखाली कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत Core Group च्या दिनांक २१/१०/२०११ रोजी झालेल्या आढावा बैठकीचे इतिवृत्त.

**प्रस्तावना-** पंतप्रधान कार्यालयाच्या दिनांक ०१/०७/२००८ च्या अधिसूचनेद्वारे मा.पंतप्रधान यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय स्तरावरील कौशल्य विकासासंदर्भातील धोरण निश्चित करण्यासाठी "राष्ट्रीय कौशल्य विकास परिषदेची (Prime Minister's National Council on Skill Development)" स्थापना करण्यांत आली आहे. मा.पंतप्रधान यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यांत आलेली राष्ट्रीय कौशल्य विकास परिषद ही प्रामुख्याने कौशल्य विकास संदर्भातील महत्त्वाची राष्ट्रीय धोरणे ठरविणे, वित्तीय व प्रशासकीय अंमलबजावणी संदर्भातील निर्णय घेणे, कौशल्य विकास संदर्भातील कार्यवाहीबाबतच्या प्रगतीचा वेळोवेळी आढावा घेणे, आवश्यकतेनुसार याबाबतच्या ध्येय धोरणामध्ये बदल / सुधारणा सुचविणे, त्याचप्रमाणे कौशल्य विकासाच्या दृष्टीने सरकारी व खाजगी क्षेत्रामध्ये समन्वय साधणे या उद्देशाने गठीत करण्यांत आली आहे.

२. मा.पंतप्रधानाच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यांत आलेल्या सदर राष्ट्रीय कौशल्य विकास परिषदेला सहाय्य करण्याच्या दृष्टीने तसेच खाजगी उद्योगधंद्याचा सहभाग प्राप्त करुन घेण्याच्या दृष्टीने राष्ट्रीय कौशल्य विकास महामंडळ (National Skill Development Corporation) तसेच राष्ट्रीय कौशल्य विकास समन्वय मंडळाची (National Skill Development Co-ordination Board) स्थापना करण्यास मान्यता देण्यांत आली आहे. उपाध्यक्ष, नियोजन आयोग, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय कौशल्य विकास समन्वय मंडळाची (National Skill Development Co-ordination Board) स्थापना करण्यांत आली आहे. कौशल्य विकास कार्यक्रम ही मा.पंतप्रधानांची

अतिशय महत्वाकांक्षी योजना (Flagship Scheme) असून राष्ट्रीय कौशल्य विकास परिषदेने सन २०२२ पर्यंत ५० कोटी कुशल मनुष्यबळाची निर्मिती करण्याचे उद्दिष्ट निश्चित केले आहे.

३. राष्ट्रीय कौशल्य विकास परिषदेच्या धर्तीवर राज्यस्तरावर या विभागाच्या दिनांक १९ मे २०१० च्या शासन निर्णयानुसार मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली "शिखर परिषदेची" आणि मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली "राज्य कौशल्य विकास कार्यकारी समितीची" स्थापना करण्यात आली आहे. राज्य कौशल्य शिखर परिषदेमध्ये मा.मुख्यमंत्री हे अध्यक्ष, मा.उपमुख्यमंत्री हे सहअध्यक्ष व मा.मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) हे उपाध्यक्ष आहेत. तसेच राज्य कौशल्य विकास कार्यकारी समितीमध्ये मा.मुख्य सचिव हे अध्यक्ष असून प्रधान सचिव (उच्च व तंत्र शिक्षण) हे उपाध्यक्ष आहेत.

४. त्यामुळे राज्यस्तरावर प्रतिवर्षी ४५ लाख कुशल मनुष्यबळ निर्माण करण्याच्या दृष्टीने संबंधित प्रशासकीय विभागांना कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत कुशल मनुष्यबळ निर्मितीचे वार्षिक उद्दिष्ट निश्चित करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

**शासन निर्णय:-** उपरोक्त पार्श्वभूमीवर कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत राज्यस्तरावर प्रतिवर्षी ४५ लाख कुशल मनुष्यबळ निर्माण करण्याच्या दृष्टीने खालीलप्रमाणे विभागनिहाय कुशल मनुष्यबळ निर्मितीचे वार्षिक उद्दिष्ट निश्चित करुन देण्यात येत आहे,

| अ.क्र. | विभागाचे नांव | प्रतिवर्ष उद्दिष्ट (लाखात) |
|---|---|---|
| १ | उच्च व तंत्र शिक्षण विभाग | १०.०० |
| २ | ग्राम विकास विभाग | १०.०० |
| ३ | उद्योग विभाग | १०.०० |
| ४ | सामाजिक न्याय विभाग | ५.०० |
| ५ | आदिवासी विकास विभाग | ५.०० |
| ६ | पर्यटन विभाग | १.०० |
| ७ | महिला व बाल विकास विभाग | १.०० |
| ८ | सार्वजनिक आरोग्य विभाग | १.०० |
| ९ | अल्पसंख्यांक विकास विभाग | १.०० |
| १० | सहकार व वस्त्रोद्योग विभाग | १.०० |
| **एकूण** | | **४५.००** |

२. कौशल्य विकास कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी संबंधित प्रशासकीय विभागांनी त्यांना निश्चित करुन देण्यात आलेले उद्दिष्ट साध्य करण्याच्या दृष्टीने आवश्यक त्या निधीची तरतूद विहित पध्दतीने करुन घेऊन व कार्यक्रमाचे वेळापत्रक आखून उद्दिष्टपूर्तीची अंमलबजावणी करावी.

C-83

३. कौशल्य विकास कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी प्रशासकीय विभागांनी आयुक्त, रोजगार, स्वयंरोजगार व कौशल्य विकास यांच्या अधिपत्याखाली स्थापन करण्यात आलेल्या "कौशल्य विकास कक्षा" कडून आवश्यक मार्गदर्शन घ्यावे.

४. हा शासन निर्णय शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यांत आला असून त्याचा संगणक संकेतांक क्र. २०१२०५२२११४४२१५२१००१ आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(रत्नाकर गायकवाड)
मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,
१. मा. मुख्य मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा. उप मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. सर्व संबंधित मा. मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा.मुख्य सचिव यांचे उपसचिव, मंत्रालय, मुंबई.
५. सर्व संबंधित प्रशासकीय विभागांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण यांचे स्वीय सहाय्यक.
७. आयुक्त, रोजगार, स्वयंरोजगार व कौशल्य विकास, मुंबई.
८. संचालक (प्रशिक्षण), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
९. संचालक (व्यवसाय शिक्षण), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१०.महालेखापाल (लेखा परीक्षा)/ (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
११.कार्यासन व्यशि-१/२/३/४.
१२.निवड नस्ती (व्यशि-५) २ प्रती.